पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

दिनांक - **०८/१२/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०८/१२/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
७. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) मा.महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१७-१८ घेणेबाबत – मा.राजू बनसोडे, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृतीचषक राष्ट्रीय हॉकी स्पर्धा घेणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) राजे शिव छत्रपती व्यायामशाळा (उद्योगनगर) चिंचवड, येथील व्यायामशाळा चालविण्यास मिळणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) महापौर चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा २०१७-१८ (महिला व पुरुष) आयोजनाकरिता पुना डिस्ट्रीक्ट व्हॉलीबॉल असोशिएशन यांना स्पर्धा खर्च अदा करणेबाबत.

---------

ठराव क्रमांक – ७४ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०८/१२/२०१७ विभाग – क्रीडा

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/१२१८/२०१७, दि.०६/१२/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कार्याध्यक्ष, पुना डीस्ट्रीक्ट इंटरऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन पुणे ४११ ००२ यांनी १) कबड्डी २) फुटबॉल ३) लॉन टेनिस ४) व्हॉलीबॉल ५) बॅडमिंटन या ५ क्रीडा स्पर्धा आर्थिक पुरस्कारासाठी म.न.पा.स दिलेल्या आहेत या स्पर्धांना अनुक्रमे र.रु.१८,७००/-, र.रु.२०,०००/-, र.रु.३०,०००/-, र.रु.२२,०००/- एकूण र.रु.१,३७,७००/- इतका खर्च असून यामध्ये मैदान/कोर्ट, पंचाचे मानधन, शटल्स् किंवा चेंडूचा खर्च, विजयी उपविजयी संघांना वैयक्तिक बक्षिसे व चषक फोटोग्राफर उदघाटन व बक्षीस समारंभ इ.चा समावेश आहे. त्यानुसार पुना डीस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन यांच्या विविध क्रीडा स्पर्धांना सन २०१७-१८ करिता म.न.पा.च्या वतीने आर्थिक पुरस्कार देणेकामी आर्थिक सहाय्य र.रु.१,३७,७००/- (अक्षरी र.रु.एक लाख सदतीस हजार सातशे फक्त) अदा करणेस व सदरचा खर्च " क्रीडा निधी वार्षिक स्पर्धा क्रीडा कला " या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०८/१२/२०१७

सुचक : मा.राजू बनसोडे अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.राजू बनसोडे, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने दापोडी येथे माह जानेवारी/फेब्रुवारी २०१८ मध्ये मा.महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०८/१२/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा. राजू बनसोडे

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृतीचषक राष्ट्रीय हॉकी स्पर्धा मेजर ध्यानचंद पॉलिग्रास हॉकी स्टेडियम येथे आयोजित करणेत यावी व

सदर स्पर्धेचे आयोजन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिति सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७७ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०८/१२/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा. राजू बनसोडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या राजे शिव छत्रपती व्यायामशाळा (उद्योगनगर) चिंचवड, मनपा व्यायामशाळा ही व्यायामशाळा उद्योगनगर – महिला विकास केंद्र, चिंचवड येथील राजे शिव छत्रपती व्यायामशाळा मनपा व्यायामशाळा केंद्रला ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यात देण्यात मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०८/१२/२०१७ विभाग - क्रीडा

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/१२१८/२०१७, दि.०६/१२/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन, पुना डिस्ट्रीक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने व श्री.वाघेश्वर व्हॉलीबॉल संघ, च-होली बु. ता.हवेली, पुणे ४१२ १०५ यांच्या सहकार्याने दि.२२/१२/२०१७ ते २५/१२/२०१७ या कालावधीत च-होली बु. येथे महापौर चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा २०१७-१८ (महिला व पुरुष) आयोजित करणेस व त्याकामी येणारा खर्च र.रु.१९,७२,९२५/- (अक्षरी र.रु.एकोणीस लाख बहात्तर हजार नऊशे पंचवीस फक्त) मिळणेबाबत पुना डिस्ट्रीक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन यांची मागणी असली तरी मनपा क्रीडा धोरणानुसार पुना डिस्ट्रीक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन यांचे नावे करारनामा करुन स्पर्धा खर्च र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३१५/२०१७
दिनांक : १२/१२/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc